**मे. महुंझा वायनरी प्रा. लि., गट नं. १/१ब, गाव चुलवड, ता. अक्राणी, जि. नंदुरबार, महाराष्ट्र या उदयोगाच्या प्रस्तावित ५ के.एल.पी.डी. (किलो लिटर प्रतिदिन) क्षमतेची मोहाफुलावर आधारीत असावणी (डिस्टिलरी) निर्मिती प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा इतिवृत्तांत :**

...........................................................................................................................................

मे. महुंझा वायनरी प्रा. लि. गट नं. १/१ब, मौजे चुलवड, ता. अक्राणी, जि. नंदुरबार, महाराष्ट्र या उदयोगाच्या प्रस्तावित ५ के.एल.पी.डी. (किलो लिटर प्रतिदिन) क्षमतेची मोहाफुलावर आधारीत आसवणी म्हणजेच (डिस्टिलरी) निर्मिती प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, तळोदा, जि. नंदुरबार यांचे अध्यक्षतेखाली दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १:०० वाजता घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई - ७५ / २०२५ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २५१०३१ – एफटीएस–००३० दि. ३१/१०/२०२५ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उप विभागीय अधिकारी,<br>तळोदा, जि. नंदुरबार | अध्यक्ष |
| २. | मा. प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, नाशिक यांचे प्रतिनिधी<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, जळगाव (प्राधिकृत) | सदस्य |
| ३. | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, धुळे | समन्वयक |

श्री. प्रणव पाखले,  उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ धुळे तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्रं. एस.ओ. १५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला होता. सदर जाहीर लोकसुनावणी बाबतची जाहीर सुचना दि. १३/१०/२०२५ रोजी दै. लोकमत (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, धुळे येथे पाठविण्याचे नमुद करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
- जिल्हा उदयोग केंद्र, नंदुरबार
- जिल्हा परिषद, नंदुरबार
- उपविभागीय कार्यालय, शहादा, जि. नंदुरबार
- तहसिल कार्यालय, अक्राणी, जि. नंदुरबार
- ग्रामपंचायत कार्यालय, चुलवड, शीसा, रडिकलाम, गौऱ्या ता. अक्राणी जि. नंदुरबार
- उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, धुळे.
- प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, नाशिक

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,(मुख्यालय), मुंबई
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पुर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर

उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर प्रकल्पा बाबत अदयाप पावेतो उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ धुळे य़ांचेकडे कुठलेही आक्षेप, टिका – टिप्पणी, सुचना लेखी अथवा ई-मेल व्दारे प्राप्त झालेल्या नाहीत. कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

समन्वयक यांनी अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली. तसेच कोणाला प्रकल्प अथवा सुनावणी बद्दल काही आक्षेप, टिका – टिपणी, सुचना असतील तर ते आपण सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर मांडू शकतात असे सांगण्यात आले.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

प्रकल्पाचे पर्यावरणीय सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले. जसे की पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी नियोजित प्रकल्पाविषयी केलेल्या सादरीकरणा नंतर नागरिकांनी मांडलेल्या सूचना / आक्षेप इत्यादींचा वृत्तांत खालीलप्रमाणे.

| अ. क्रं. | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी नोंदविणा-या व्यक्तिचे नांव व पत्ता | उदयोगाच्या प्रतिनिधीने दिलेले आश्वासन / उत्तर |
|---|---|---|
| १. | श्री. प्रकाश पावरा – <br><br> रा. चुलवड, ता. अक्राणी, जि. नंदुरबार यांनी मुददा उपस्थित केला की, रोजगार देतांना स्थानिक रहिवाशांना प्राधान्य देण्यात यावे. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, रोजगाराच्या संधी देतांना किमान १० स्थानिक व पंचक्रोशीतील नागरिकांना प्राधान्य देण्यात येईल व उर्वरीत रोजगाराबाबत स्थानिकांना त्यांच्या शिक्षण व कौशल्यानुसार प्राधान्य देण्यात येईल. |
| २. | श्री. जोरदार बारकू पावरा – <br><br> रा. चुलवड, ता. अक्राणी, जि. नंदुरबार यांनी मुददा उपस्थित केला की, प्रकल्पातील निघनारे सांडपाणी हे कोठे सोडण्यात येणार आहे. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, कंपनी 'शून्य द्रव उत्सर्जन/स्त्राव' (Zero Liquid Discharge अर्थात ZLD) धोरणाचे पालन करेल, ज्या अंतर्गत कोणतेही पाणी कारखाना परिसराच्या बाहेर सोडले जाणार नाही. |
| ३. | श्री. सुरज पावरा – <br><br> रा. चुलवड, ता. अक्राणी, जि. नंदुरबार यांनी मुददा उपस्थित केला की, कंपनीच्या परिसरात आपण किती झाले लावणार आहेत. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, कंपनीच्या परिसरात आपण ३३ टक्के जागेत अंदाजे ६०० झाडे लावणार आहोत. |
| ४. | श्री. सुगंधा रेड्डी – पर्यावरणवादी – यांनी पुढील नमुद केलेले मुद्दे उपस्थित केले. | |

| | | |
|---|---|---|
| | बेरोजगारी ही देशातील प्रमुख प्रदुषण आहे. देशात रोजगार निर्मीती ही प्रामुख्याने शासनाव्दारे केली जाते. साधारणत: दरवर्षी १ कोटी युवक हे नोकरी मिळविण्यासाठी बाहेर पडत असतात. काही गैर सरकारी संस्था (NGO) या व्दारे असा प्रचार करण्यात येतो की, उद्योंगामुळे लोकांचे आरोग्य बाधीत होते. देशातील एकूण लोकसंख्येच्या १५% लोकसंख्या ही औद्योगिक क्षेत्रांच्या लगत निवास करते. तथापी, उद्योंगामुळे लोकांचे आरोग्य बाधीत होते हे निरर्थक असल्याचे नमुद केले. एका उद्योगामुळे साधारणत: प्रत्यक्ष रोजगार निर्मीतीची संख्या १० असून अप्रत्यक्ष रोजगार निर्मीतीची संख्या १०० ते २०० इतकी असते. पर्यावरण संमतीकरिता (Environment Clearance) साधारणत: ३ वर्षे लागतात. आमची शासनाला विनंती आहे की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा कालावधी कमी करण्यात यावा. उद्योगाच्या आवारात झाडे लावतांना फळे व औषधी वनस्पती यांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा. उद्योगाने आपल्या जागेत पावसाच्या पाण्याची साठवण (Rain Water Harvesting) याचा वापर करावा. स्थानिक नागरिकांशी रोजगार व इतर बाबींकरीता समन्वय समितीची स्थापना करावी. मी प्रकल्पाचे पर्यावरणीय सल्लागार यांचे | |

| | | |
|---|---|---|
| | अभिनंदन करतो. तसेच केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, मंत्रालय, भारत सरकार यांना विनंती करतो की सदर प्रकल्पास आपण पर्यावरण संमती (Environment Clearance) देण्यात यावी. | |

सदर जाहीर लोक सुनावणीचे मा. अध्यक्ष, यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात परंतु कोणीही मुददा उपस्थित केला नाही.

जनसुनावणीचे संयोजक श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे यांनी उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची यथोचित नोंद घेण्यात आली असून त्यांचा समावेश जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये केला जाईल, तदनंतर संयोजक श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे यांनी मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने उपस्थित नागरिकांचे आभार मानुन जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**( प्रणव पाखले )**
समन्वयक
तथा उ.प्रा.अ.,
म.प्र.नि. मंडळ, धुळे

**( करणसिंग राजपूत )**
उ.प्रा.अ.,
म.प्र.नि. मंडळ, जळगाव (प्राधिकृत)
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांचे
प्रतिनिधी

**( अनय नावंदर, भाप्रसे)**
अध्यक्ष तथा
सहा.जिल्हाधिकारी,
उप विभागीय अधिकारी,
तळोदा, जि. नंदुरबार